Awakening on newspaper economics and problems of journalists

Four divisional conventions under the chairmanship of state president Vasant Munde were successful

पांडे, लोकपत्रचे कार्यकारी संपादक रविंद्र तहकीक, परिषदेचे निमंत्रक आणि पत्रकार संघाचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.प्रभू गोरे, ज्येष्ठ संपादक संतोष मानूरकर, पत्रकार संघाचे विभागीय संघटक वैभव स्वामी, राज्य माध्यम समन्वयक भगवान राऊत यांच्यासह औरंगाबाद, जालना, …

Importance of print media will never end: state president Vasant Munde

The voice of the people will remain alive only if newspapers survive

Vasant Munde, State President of Maharashtra State Marathi Journalists' Association

Newspapers will not survive without professional mindset

Aadunik Kesari decided Sunday off

माणूस म्हणून वृत्तपत्रातील कर्मचाऱ्यांच्या भावना समजून घ्याव्यात

वृत्तपत्र व्यवसायात अनेक जुन्याच रूढी, परंपरा सुरू आहेत. मी एक-एक करून सर्वच गोष्टीत आमूलाग्र सकारात्मक बदल घडवून आणत आहे. मागच्या वर्षी औरंगाबादेत घेण्यात आलेल्या महाराष्ट्रातल्या पहिल्या संपादक गोलमेज परिषदेत मी वृत्तपत्रांच्या किंमतवाढीचा मुद्दा मांडला आणि त्याला सर्वच संपादकांनी सहमतीही दिली. राज्यातील जवळपास 185 दैनिकांच्या व्यवस्थानाने माझ्या आवाहनानंतर आपल्या अंकाची किंमत दुपटीने वाढवली आणि त्याला एकाही वाचकाने विरोध केला नाही. दैनिकाला साप्ताहिक सुटी असलीच पाहिजे, हे मी यापूर्वीच सांगितले आहे.

लाखो रुपये पगार उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सरकार पाच दिवसांचा आठवडा करत आहे, मग तुटपुंज्या पगारावर काम करणाऱ्या वृत्तपत्रातील कर्मचाऱ्यांवर अन्याय का? …

आधुनिक केसरी न्यूज

औरंगाबाद : आज राष्ट्रीय पत्रकारिता दिनाचे औचित्य साधून दैनिक आधुनिक केसरीने दर रविवारी सर्व पत्रकारांना सुटी देण्याचा निर्णय घेतला आहे. वृत्तपत्रात काम करणारे कर्मचारीही माणसेच आहेत. त्यांनाही कुटुंब आहे, जबाबदारी, भावना आहेत. त्यामुळे इतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच त्यांनाही एक दिवसाची तीही इतरांप्रमाणेच रविवारी सुटी असलीच पाहिजे, म्हणून आधुनिक केसरी व्यवस्थापनाने दर रविवार संपूर्ण कर्मचाऱ्यांना सुटी देत आठवड्यातून एक दिवस दैनिक बंद ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

साप्ताहिक सुटीची कायदेशीर अडचण येईल असे वाटत नाही

आर्थिक विषयांवर निघणारी दैनिके पूर्वी साप्ताहिक सुटी घेत असत. सध्याही आर्थिक विषयांवर निघणारी काही दैनिके साप्ताहिक सुटी घेतात. त्यामुळे दैनिकांनी साप्ताहिक सुटी घेतली तर कोणतीही कायदेशीर अडचण उद्भवेल असे वाटत नाही.

एकेकाळी दैनिकांखेरीज माहितीची अन्य साधने उपलब्ध नसल्याने दैनिके साप्ताहिक सुटी घेत नव्हती. आता माहितीची अनेक साधने उपलब्ध असल्याने सुटीच्या निर्णयाचा वाचकांवर फारसा परिणाम होणार नाही. दैनिकात काम करणाऱ्याला प्रत्येकाला आठवड्यात एक सुटी मिळणे आवश्यकच आहे. अशी सुटी एकत्रितपणे घेणे हे दैनिकाच्या सुटीचे कारण म्हणता येईल. मात्र दैनिकाला सुटी द्यायची आणि त्याच्या सुटीच्या दिवशी त्याच नावाचे साप्ताहिक काढायचे असे करणे टाळावे, असे माझे वैयक्तिक मत आहे.

दैनिकाला सुटी हवी कशाला?

दैनिक आणि सैनिक कायम कर्तव्यावर तैनात असतात, असे म्हटले जाते. परंतु आता तंत्रज्ञानामुळे काळ वेगाने बदलला आहे. आता बातमीसाठी दैनिक फारसे कुणी वाचत नाही. उलट ज्याला बातमी कळली तोच ती सर्वांना पाठवतो. बातमीपलीकडे विचारांना दिशा देणे हे दैनिकांचे खरे काम आहे. त्यासाठी पत्रकार सक्षम आहेतच. पण त्यांच्या मानसिक स्वास्थ्याचा विचार आज राष्ट्रीय पत्रकारिता दिनानिमित्त होणे आवश्यक आहे.

माणसाचा मेंदू म्हणजे घाण्याचा बैल नाही. तो सतत श्रम करत असेल तर नवनिर्मितीची शक्यता कमी होत जाते. समाजाला नवीन विचार देणे हीच पत्रकारितेची आजवरची परंपरा आहे. त्यामुळे पत्रकारांनी कुटुंबीय आणि मित्रांसोबत रविवारची सुटी मजेत घालवावी. दूरवर भटकंती करावी, किंवा शांतपणे एकांत अनुभवावा. यातून त्यांना जे नवीन विचार स्फुरतील त्यांची चमक वेगळीच असेल. पुढील आठवडाभर ते नव्या ऊर्जेने काम करू शकतील. पत्रकारिता दिन वगैरे आला की, पत्रकारांच्या कामाचे कौतुक करणारे संदेश एकमेकांना पाठवले जातात. त्यात एक गोष्ट समान असते. ती म्हणजे "पत्रकाराला आपल्या कुटुंबीयांपासून कसे दूर रहावे लागते. बाकीचे लोक रविवारी सायंकाळी मस्त बागेत फिरतात, पण पत्रकार त्या वेळी कसा दैनिकात कामाला वाहून घेतो..." वगैरे संदेशातून पत्रकारांची स्तुती केली जाते. पण या एका दिवसाच्या स्तुतीसाठी आयुष्याशी नाते तोडावे का? हा खरा प्रश्न आहे. अन्य नोकऱ्यांप्रमाणेच पत्रकारालाही इतरांसोबत सुट्या आणि वेतन व्यवस्थित मिळाले तर या क्षेत्रात नवीन पिढी मोठ्या संख्येने येईल. विविध क्षेत्रांतील हुशार माणसे पत्रकार झाली तरच हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मजबूत होईल.

State convention successful under the strong leadership of state president Vasant Munde

ठाणे । प्रतिनिधी

प्रसार माध्यमाचा प्रभाव कमी झाला तर लोकशाही कमकुवत होईल, त्यामुळे समाजानेच माध्यमाची उपयुक्तता ओळखुन वृत्तपत्रांना मदत करावी. पत्रकारांनीही कोणाच्या सांगण्यावरून बातमी न देता खरी माहिती द्यावी, म्हणजे विश्वास वाढेल, असे सांगुन प्रबोधनाचे मार्केटिंग होणार नाही याची खबरदारी पत्रकारांनी घ्यावी, असे आवाहन केंद्रीय मंत्री कपील पाटील यांनी केले. पत्रकार संघाच्या मागण्यांसाठी सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाहीही दिली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे सोळावे राज्यस्तरीय अधिवेशन ठाणे येथील गडकरी रंगायतन सभागृहात मंगळवार दिनांक २८ डिसेंबर रोजी दोन सत्रात …ध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली …

…मागील दोन वर्षांपासून कोरोना जागतिक …रीमुळे पत्रकार संघाचे राज्यअधिवेशन …यात आले होते. मात्र यंदा पत्रकार …यांच्या आग्रहाखातर कोरोना नियमाचे … करून प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या … नेतृत्वखाली ठाण्यात सोळावे राज्य …वेशन यशस्वीरित्या संपन्न झाले. कोरोना …ळात वृत्तपत्र व पत्रकारांसमोर …नवलेल्या समस्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन, …लाइन चर्चा करून, संपादकांची गोलमेज …द घेवून तसेच विभागीय अधिवेशनाच्या …मातून प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी …काईने अभ्यास केला. त्यामुळेच या …वेशनात दोन्ही सत्रात वृत्तपत्रसृष्टी …ील समस्या व उपायावर चर्चा होऊन …यात सकारात्मक कार्य करण्याची ऊर्जा …ल्याची भावना उपस्थित पत्रकार …वांनी वक्त केली. या अधिवेशनाचे …न केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या … झाले. यावेळी सरचिटणीस विश्वास …

अधिवेशनात मांडले पत्रकारांचे विविध ठराव

वृत्तपत्र ग्राहकांना उत्पन्न करात वर्षीक पाच हजाराची सवलत द्यावी. जाहिराती वरील पाच टक्के जीएसटी कमी करावा. पत्रकारांचा प्रतिनिधी विधीमंडळात नियुक्त करावा. , पत्रकार सन्मान योजनेतील जाचक अटी शिथिल करण्यात याव्यात. वृत्तपत्र अंक विक्री किंमत उत्पादन खर्चावर आधारित ठरवण्याचे अधिकार वृत्तपत्र चालकांना असावेत. वृतपत्रानीही आठवड्याची सुट्टी घ्यावी. यासह विविध महत्वाचे ठराव यावेळी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्यातील उपस्थित पत्रकारांच्या सहमतीने मांडण्यात आले. या अधिवेशनात राज्य पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांना ओळखपत्र, दैनंदिनी, बॅग, हेल्मेट आदी साहित्याचे वाटप करण्यात

अंक विक्रीचे पारंपरिक धोरण बदलले तरच मराठी वृत्तपत्राना स्थैर्य-प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे

पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी आपली भूमिका मांडताना पत्रकारांसमोरील समस्यांचा सविस्तर मागोवा घेतला .कोरोनानंतर प्रादेशिक वर्तमानपत्रांसमोरील आव्हाने मांडून त्यांनी वृत्तपत्रे आर्थिक पातळीवर आत्मनिर्भर होण्यासाठी स्वस्तात अंक विक्री करण्याचे पारंपरिक धोरण बदलावे आणि असे केले तरच या क्षेत्रात काम करणाऱ्याना रोजगाराचे स्थैर्य मिळेल, असे सांगितले.शेवटी त्यांनी पत्रकार संघाच्या वर्षभरातील कामाचा अहवाल सादर केला.सरचिटणिस विश्वास आरोटे व कोकण विभागिय अध्यक्ष नितीन शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

नेमकेपणाने बोट ठेवले.पत्रकारांच्या हत्या आणि अटक याचा उल्लेख करत पत्रकारांसमोरील धोके स्पष्ट केले. लोकशाहीत पत्रकार हा चौथा खांब असल्याने लोकशाहीची इमारत मजबूत आहे.बदलत्या परिस्थितीत माध्यमांचा प्रभाव कमी झाला तर लोकशाहीच कमकुवत होईल.त्यामुळे समाजानेच माध्यमाची उपयुक्तता ओळखुन वृत्तपत्रांना मदत केली पाहिजे.त्यासाठी पत्रकारांनीही कोणाच्या सांगण्यावरून बातमी न देता खरी माहिती द्यावी.म्हणजे लोकांचा वृत्तपत्रांवरील विश्वास वाढेल. आपल्या बाबत कोणाच्या सांगण्यावरून दिलेल्या दोन बातम्याची उदाहरणे देऊन त्यांनी पत्रकरीतेतील चुकीच्या बाबीबरही परखड मत मांडले.पण अपवाद वगळता पत्रकारांमुळेच समाजच प्रबोधन होत. त्यामुळे प्रबोधनाचे मार्केटिंग होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे अवाहनही त्यांनी केले.शेवटी ना. पाटील यांनी राज्य पत्रकार संघाच्या कार्याचे कौतुक करून केंद्रीय स्तरावरील मागण्यांसाठी मदत करण्याची ग्वाही दिली.

SATURDAY | SEPTEMBER 26, 2020

दैनिक एशिया एक्सप्रेस

روزنامہ ایشیا ایکسپریس

Roznama Asia Express

The role of journalist Vasant Munde is being discussed across the state

70 dailies of the state took notice

बीड (प्रतिनिधी):- महागाई गगनाला भिडली आहे, झेरॉक्स पेपरपासुन ते प्रत्येक वस्तुची किंमत वाढली आहे. मात्र दैनिकांची किंमत अजुनही १ रूपयापासुन ते ५ रूपयापर्यंतच आहे. यामुळे राज्यभरातील दैनिके आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष वसंत मुंडे यांनी सर्वप्रथम हा मुद्दा उपस्थित केला. वसंत मुंडेंनी मांडलेली भुमिका राज्यभर चर्चीली जात असुन राज्यातील तब्बल ७० दैनिकांनी त्यांच्या मुद्दयाची दखल घेतली आहे.

बीड येथील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष वसंत मुंडे यांनी 'स्थानिक वृत्तपत्रांना लोकांचा अर्थाश्रय आवश्यक, अंकाची किंमत वाढवली तरच वर्तमानपत्र जिवंत राहतील' अशी भुमिका मांडली. राज्यातील ७० पेक्षा अधिक दैनिकांनी त्यांच्या भुमिकेची दखल घेतली असुन राज्यभरात या मुद्दयावरून चर्चा सुरू झाली आहे. दैनिकांच्या संदर्भात एक सकारात्मक भुमिका मांडुन त्या भुमिकेला पुढे घेवुन जाण्याचे काम स्वत: वसंत मुंडे करत आहेत. वसंत मुंडे यांच्या भुमिकेने वृत्तपत्र क्षेत्राचे अर्थगणित राज्याच्या पटलावर मांडले गेले असुन अनेक जेष्ठ आणि अनुभवी संपादक, तज्ञ यांच्यात या मुद्यावरून साधक-बाधक चर्चा सुरू झाली आहे. राज्यस्तरातुन या मुद्दयाविषयी सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या आहेत.